(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE : CCXXVI (226)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with OKEN Scanner

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महिलांवरील अत्याचार | डॉ. विजय टोंगे | 1 |
| 2 | स्वामी विवेकानंद यांचे धर्म आणि भारत राष्ट्र याविषयीचे विचार | प्रा.विलास मेश्राम | 6 |
| 3 | महिला उत्पीडन आणि स्वामी विवेकानंद | प्रा. पंकज वा. मुन | 10 |
| 4 | स्त्री आणि घरगुती हिंसा | सुरेश महादेवराव देशमुख | 14 |
| 5 | कौटुंबिक हिंसाचार आणि महिला | डॉ. सुनिल शिंदे | 19 |
| 6 | ताण—तनाव : कारणे, परीणाम आणि उपाययोजना | प्रा. आदित्य कि. सारवे | 23 |
| 7 | कौटुंबिक हिंसाचाराचे समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | 27 |
| 8 | भारतीय कुटुंब व्यवस्था आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ.राजेंद्र मुर्लिधरराव झाडे | 33 |
| 9 | मानवी हक्क आणि कौटुंबिक हिंसा | डॉ. प्रमोद माधवराव आचेगावे | 36 |
| 10 | जाहिरात : एक अध्ययन | डॉ. सुरेश बन्सपाल | 39 |
| 11 | कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व उपाय | सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी | 43 |
| 12 | बदलत्या काळानुसार स्त्रीयांची बदलती वर्तणुक | प्रा.डॉ. छाया निलकंठ लंजे | 46 |
| 13 | घरगुती हिंसाचार — एक ऐतिहासिक विवेचन | डॉ. अनुश्री माहुरकर | 49 |
| 14 | कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण | डॉ. मदन जी. प्रधान | 52 |
| 15 | कुटूंबातील कुटूंबप्रमुख आणि घरगूती हींसा | सहा.प्रा. गिरिश गं. गवई | 56 |
| 16 | क्रिडाक्षेत्र व महिला | प्रा.धनंजय गिऱ्हेपुजे | 58 |
| 17 | कौटुंबिक हिंसाचार: भारतीय समाजात हुंडा पध्दत एक कारण | प्रा. चौधरी गोपाल विश्वनाथ | 60 |
| 18 | कौटुंबिक हिंसेतील भिन्नता:—पूर्वी व आता | प्रा.भूमिका आनंदरावजी कापगते | 62 |
| 19 | आजची संस्कृती आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ. सुनील पखाले | 65 |
| 20 | कौटुंबिक हिंसाचार : एक सामाजिक समस्या | प्रा. बळीराम वसंतराव पवार | 67 |
| 21 | नियतकालिके: बुध्दिजीवी समाजाची आवश्यकता | डॉ. पल्लवी साहेबराव काळे | 70 |
| 22 | महिलांच्या संदर्भात कौटुबिंक हिंसाचार आणि भारतीय कायदे | प्रा. रिता प्रेमदास खोब्रागडे | 73 |




Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar** International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# स्वामी विवेकानंद यांचे धर्म आणि भारत राष्ट्र याविषयीचे विचार

प्रा.विलास मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस्, ॲन्ड कॉमर्स, पवनी,
ता.पवनी,जि.भंडारा

जीवन परिचय :

स्वामी विवेकानंद म्हणून दिंगतात गाजलेल्या या सन्यासाचे मुळ नाव नरेंद्र दत्त होते. नरेंद्र हे प्रतिश्ठा संपन्न अशा थोर क्षत्रीय कुलात जन्माला आले होते. त्यांच्या उभ्या जीवनावर या क्षात्रवृत्तीचा ठसा उमटलेला दिसुन येतो. १२ जानेवारी १८६२ रोजी नरेंद्राचा जन्म झाला. नरेंद्र यांचे वडील कलकत्त्याच्या हाय कोर्टात ॲटनी—ॲड ला होते. ते स्वभावाने उदार, खर्चीक व वृत्तीने अशांत होते. मानव मात्राविशयी अपार कळवळा त्यांना असल्यामुळे जातिभेदांदी गोश्टींना त्यांच्या आयुश्यात थारा नव्हता. नरेंद्रांची आईसुध्दा सुविदय बहुश्रृत व सुसंस्कृत होती. राजघराऱ्याचे तेज तिच्या चर्येवर व एकुण व्यक्तिमत्वावर विलसत होते.

एखाद्या कलावंत राजपुत्रासारखे नरेंद्रांचे बालपण होते. सिहांचे पौरूष आणि सशाचे चापल्य अंगी असलेले नरेंद्र अनेक शारीरिक, बौध्दीक गुणांचे वरदान उपजतच घेऊन आले होते. खेळकसरतींपासुन स्वर रचनेपर्यंत सर्व क्षेत्रात लीलया संचार करणारी त्यांची बुध्दीमत्ता कुशाग्र व चतुरस्त्र होती. तीला धार्मीक अंत:करणाची व अतिव पावित्र्याचीही जोड मिळालेली होती. मनाची व देहाची ही एक मोठी आध्यात्मिक शक्ती आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. तीव्र स्मरणशक्तीच्या बळावर त्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनात मोठी क्रांती संपादीली होती. नरेंद्रनाथ हे खरोखरच अलौकीक बुध्दीमत्तेचे धनी होते. स्पेन्सर, काल, हेगेल मिल प्रवृत्ती तत्वचिंतकाच्या विचारांचा त्यांना जवळून परिचय घडला होता. देशोदेशी भ्रमंती करून त्यांनी पाश्चात्य संस्कृतिचेही सुक्ष्म अवलोकन केले आहे.

स्वामी विवेकानंदच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे श्रेय या शिक्षणापेक्षा त्यांच्या गुरूंना रामकृश्ण परमहंसांना आहे.

<u>धर्म विषयी विचार</u> :—

या देशातील राजकिय विचाराला विवेकानंदांनी दिलेली पहिली महत्वाची देणगी म्हणजे राष्ट्रीय जीवनासाठी धर्माला त्यांनी दिलेले, मध्यवर्ती स्थान ही होय! नवभारताची उभारणी ही धार्मिक आध्यात्मिक अधिष्ठानावरच होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता. विवेकानंद म्हणतात भारताला जर जिवंत राहावयचे असेल तर त्याने धर्मालाच आपल्या राष्ट्रीय जीवनाचा मुलाधार करावयास हवा. तसे केल्या खेरीज गत्यतर नाही. कारण भारतात धर्म हाच पूर्वापार राष्ट्रीय जीवनाचा केंद्रबिंदू आहे. भव्य अशा या राष्ट्रमंदिराचा तो भक्कम आधार आहे. राजकारण, सत्ता व बुध्दी यांनादेखील या देशात दुय्यम स्थान आहे. म्हणून भारतात केवळ धर्म हीच एकविचारात घेण्यासारखी बाब आहे. ज्या गोष्टी भारतीयांच्या जीवनात आवश्यक आहेत वा उपयुक्त आहेत त्या गोष्टीसंबंधी ज्ञानाचा वा जिज्ञासेचा भारतात अभाव नाही. अशा गोश्टी म्हणजे धर्म व आध्यात्मिकता या होत. भारतीयांच्या जीवनाचा व विकासाचा हाच एकमेव आधार सदैव होता.

व्यक्तिप्रमाणेच प्रत्येक राश्ट्राचे एक विशिश्ट जीवनध्येय असते, ते त्याच्या जीवनाचे केंद्र असते. हे ध्येय त्याच्या जीवनरूपी संगीतातील मुख्य सुराप्रमाणे असते व इतर सर्वगोष्टी गौण



Scanned with OKEN Scanner